# नियमीत दिवाणी दावा क्र. ०८/२०१६ मध्ये निशाणी ३६ वरील आदेश

०१. वादींनी सदचा अर्ज हा प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ यांना अतिक्रमीत क्षेत्रासोबत त्याचे क्षेत्र विक्री केल्यामुळे वादीने प्रतिवादी क्र.२ यांना सदर दाव्यात पक्षकार केले आहे. त्यामुळे वादीने त्या अनुषंगाने निशाणी १५ अन्वये प्रस्थापती केलेल्या वादमुद्दयांमध्ये दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे. सदर अर्जावर प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज हा प्रतिवादींच्या म्हणण्याविना चालविण्यात येतो.

०२. अर्ज, पटलावरील इतर दस्त यांचे अवलोकन केले. वादी यांच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी यांचे वकीलांचा पुकारा केला असता गैरहजर असल्यामुळे सदरचा अर्ज त्यांच्याविरुध्द विनायुक्तिवाद चालविण्यात येतो.

०३. वादींनी सदरचा दावा हा अतिक्रमण क्षेत्राचा ताबा मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादींनी अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ यांना अतिक्रमीत क्षेत्रासोबत त्याचे क्षेत्र विक्री केल्यामुळे वादीने प्रतिवादी क्र.२ यांना सदर दाव्यात पक्षकार केले आहे. त्यामुळे वादीने त्या अनुषंगाने निशाणी १५ अन्वये प्रस्थापती केलेल्या वादमुद्दयांमध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे वादीने दाखल केलेला अर्ज हा प्रकरण लांबवीण्यासाठी दाखल केला नाही हे स्पष्ट होते. त्यामुळे वादीचा सदरचा अर्ज हा मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

–: आदेश :–

१. निशाणी ३६ वरील अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. निशाणी १५ वरील प्रस्थापीत केलेल्या मुद्दयांमध्ये दुरुस्ती करण्यात येते.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by DNYANESHWAR MADHUKAR GITTE
Date: 2026.07.02 17:23:36 +0530

ठिकाण :– रेणापुर

दिनांक :– ०२/०७/२०२६

(ज्ञा.म.गित्ते)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
रेणापुर